**Appreciation Report on the Commendable Act of Mr. Aryan Lolayekar, MBBS Student (Batch 2021), Vedantaa Institute of Medical Sciences, Dahanu.**

**Student Name: Mr. Aryan Lolayekar**
**Course: MBBS**
**Batch: 2021**

This report is submitted to place on record the remarkable presence of mind, professional competence, and humanitarian service demonstrated by Mr. Aryan Lolayekar, MBBS student of Vedantaa Institute of Medical Sciences,Dahanu.

On 3rd February 2026, Mr. Aryan Lolayekar was travelling on an IndiGo Airlines flight from Goa to Mumbai when a fellow passenger suddenly developed a serious medical emergency mid-air. The passenger complained of severe breathlessness, dizziness, and altered sensorium. The cabin crew immediately made an announcement requesting medical assistance.

Responding without hesitation, Mr. Aryan approached the patient and conducted a rapid clinical assessment. He identified that the passenger was suffering from diabetic hypoglycaemia with a rapidly falling blood glucose level, along with respiratory distress. At a cruising altitude of several thousand feet, the situation was life-threatening.

Using the onboard medical kit, Mr. Aryan initiated immediate first aid measures and provided oxygen support, continuously monitoring the patient’s condition. His timely intervention helped stabilize the passenger and prevent further deterioration until the aircraft landed safely at Mumbai Airport, where the patient was handed over to ground medical staff and shifted to a hospital for further treatment.

Mr. Aryan’s calm judgment, clinical skills, and compassion under pressure reflect the highest ideals of the medical profession. His actions not only saved a life but also brought great credit to Vedantaa Institute of Medical Sciences. The incident has received recognition and coverage from reputed media houses including Lokmat, Prudna, Mumbai Kesari Times, and KAT Khabar Aaj Tak.

The institution places on record its deep appreciation for Mr. Aryan Lolayekar’s courage, responsibility, and humanitarian service. His conduct is a proud example of the values of service, ethics, and excellence that Vedantaa Institute of Medical Sciences strives to instill in its students.

यावर त्यांनी विशेष भर दिला.

**मेडिकल विद्यार्थी आर्यन लोलयेकरच्या प्रसंगावधानामुळे वाचला प्रवाशाचा जीव**

# विमान प्रवासादरम्यान आकाशात अवतरला 'देवदूत'

**अनिलराज रोकडे/ वसई**

वैद्यकीय शिक्षण हे केवळ पदवीसाठी नसून आणीबाणीच्या प्रसंगी एखाद्याचे प्राण वाचवण्यासाठी असते, याचा प्रत्यय नुकताच गोवा-मुंबई विमान प्रवासादरम्यान आला. पालघर जिल्ह्यातील वेदांत मेडिकल कॉलेजचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी आणि वसईचा रहिवासी डॉ. आर्यन लोलयेकर याने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे एका सहप्रवाशाला अक्षरशः जीवदान मिळाले.

ही घटना ३ फेब्रुवारी रोजी घडली. गोवा येथील दाबोलीम विमानतळावरून दुपारी ३.५० वाजता इंडिगो एअरलाइन्सचे विमान मुंबईकडे झेपावले. विमान हवेत स्थिरावल्यानंतर काही वेळातच एका सहप्रवाशाला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. क्षणोक्षणी त्या प्रवाशाची प्रकृती खालावत गेली आणि विमानातील वातावरण तणावपूर्ण झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विमानातील क्रू मेंबर्सनी "विमानात कोणी डॉक्टर आहेत का?" अशी घोषणा केली. त्यावेळी एमबीबीएसच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेले डॉ. आर्यन लोलयेकर तत्काळ मदतीसाठी पुढे सरसावले.

रुग्णाची तपासणी करताना डॉ. आर्यन यांनी रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने घटत असल्याचा अंदाज घेतला. रुग्णाचा नाडीचा वेग कमी होत होता आणि तो अर्धबेशुद्ध अवस्थेत जात होता. हजारो फूट उंचीवर उड्डाण करणाऱ्या विमानात ही परिस्थिती अत्यंत धोकादायक ठरू शकत होती. अशा वेळी डॉ. आर्यन यांनी शांतपणे परिस्थिती हाताळत तातडीने प्रथमोपचार सुरू केले. विमानात उपलब्ध असलेल्यां आपत्कालीन ऑक्सिजन सिलिंडरचा वापर करून रुग्णाला ऑक्सिजन देण्यात आला.

त्यांच्या या तत्पर प्रयत्नांमुळे काही वेळातच रुग्णाची प्रकृती स्थिर होऊ लागली. सुमारे ४५ मिनिटांनंतर विमान मुंबई विमानतळावर सुरक्षित उतरले. तेथे इंडिगोच्या ग्राऊंड स्टाफने संबंधित प्रवाशाला पुढील उपचारांसाठी तातडीने रुग्णालयात दाखल केले.



प्रवाशाची अवस्था पाहून क्षणभर भीती वाटली, पण वैद्यकीय शिक्षणाने धैर्य दिले. रुग्णाला वेळेवर ऑक्सिजन मिळाला नसता तर परिस्थिती गंभीर झाली असती. एका जीवाचे प्राण वाचवू शकलो, याचे मोठे समाधान आहे.

\- डॉ. आर्यन लोलयेकर

### इंडिगोकडून विशेष कौतुक

या प्रसंगी डॉ. आर्यन यांनी दाखवलेले धैर्य, शांतता आणि प्रसंगावधान याबद्दल इंडिगो एअरलाइन्स तसेच विमानातील प्रवाशांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे आभार मानले. एका भावी डॉक्टरने आपले कर्तव्य बजावत एका अनमोल जीवाचे रक्षण केल्याने सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

---

लोकमत

# विमानात रुग्णासाठी 'देवदूत' आला धावून

## मेडिकल विद्यार्थ्याच्या प्रसंगावधानाने वाचला जीव

**लोकमत न्यूज नेटवर्क**



**नालासोपारा :** विमान प्रवासात एका प्रवाशाला अचानक चक्कर येऊ लागली. त्याच्या रक्तातील साखर वेगाने कमी झाल्याने त्याला प्रचंड अस्वस्थ वाटू लागले. हजारो फूट उंचीवर अशा आणीबाणीच्या प्रसंगी या प्रवाशासाठी अक्षरशः 'देवदूत' धावून आला. पालघर जिल्ह्यातील वेदांत मेडिकल कॉलेजमधील अंतिम वर्षाचा विद्यार्थी आणि वसईचा रहिवासी असलेल्या डॉ. आर्यन लोलयेकर याने दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे प्रकृती बिघडलेल्या प्रवाशाला जीवदान मिळाले. ३ फेब्रुवारी रोजी गोवा ते मुंबई या विमान प्रवासादरम्यान ही घटना घडली.

प्रसंगावधान राखून डॉ. आर्यन यांनी संबंधित प्रवाशाला कृत्रिम श्वासोच्छ्वास देऊन त्यांचा जीव वाचविला. गोवा येथील दाबोलीम विमानतळावरून दुपारी ३:५० वाजता इंडिगो एअरलाइन्सचे विमान मुंबईसाठी झेपावले. काही वेळातच एका सहप्रवाशाला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. रक्तातील साखरेचे प्रमाण वेगाने कमी झाले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विमानातील क्रू मेंबर्सनी 'विमानात कोणी डॉक्टर आहे का?' अशी विचारणा केली. यावेळी एमबीबीएसच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या डॉ. आर्यन लोलयेकर यांनी जराही वेळ न दवडता मदतीसाठी धाव घेतली.

### तत्परतेमुळे प्रकृती स्थिर

डॉ. आर्यन यांनी उपलब्ध आपत्कालीन ऑक्सिजन सिलिंडरद्वारे रुग्णाला कृत्रिम श्वासोच्छ्वास दिला. ४५ मिनिटांनंतर विमान मुंबईत उतरले. इंडिगो ग्राउंड स्टाफने रुग्णाला रुग्णालयात हलवले. डॉ. आर्यन यांनी दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे प्रवाशांनी टाळ्यांच्या गजरात आभार मानले.

"

प्रवाशाची अवस्था पाहून क्षणभर भीती वाटली; पण वैद्यकीय शिक्षणाने मला धैर्य दिले. रुग्णाला वेळेवर ऑक्सिजन मिळाला नसता तर परिस्थिती गंभीर झाली असती. एका जीवाचे प्राण वाचवू शकलो, याचे समाधान मोठे आहे.

**डॉ. आर्यन लोलयेकर**

Mumbai Main
Page No. 5 Feb 08, 2026
Powered by: erelego.com

**Lokmat**

3m ·

विमान प्रवासात एका प्रवाशाला अचानक चक्कर येऊ लागली. त्याच्या रक्तातील साखर वेगाने कमी झाल्याने त्याला प्रचंड अस्वस्थ वाटू लागले. हजारो फूट उंचीवर अशा आणीबाणीच्या प्रसंगी या प्रवाशासाठी अक्षरशः 'देवदूत' धावून आला. पालघर जिल्ह्यातील वेदांत मेडिकल कॉलेजमधील अंतिम वर्षाचा विद्यार्थी आणि वसईचा रहिवासी असलेल्या डॉ. आर्यन लोलयेकर याने दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे प्रकृती बिघडलेल्या प्रवाशाला जीवदान मिळाले. ३ फेब्रुवारी रोजी गोवा ते मुंबई या विमान प्रवासादरम्यान ही घटना घडली.

A medical student, Dr. Aryan Lolayekar, saved a passenger's life on a Goa-Mumbai flight. The passenger's blood sugar dropped drastically. Dr. Aryan provided timely oxygen, stabilizing him until the plane landed. His quick thinking was lauded by passengers.

#LokmatNews #MarathiNews #GoaMumbaiflight



पुढारी

# मेडिकल विद्यार्थ्याच्या प्रसंगावधानाने वाचला विमान प्रवाशाचा जीव

## गोवा-मुंबई इंडिगो विमानातील थरार

वसई : पुढारी वृत्तसेवा

वैद्यकीय शिक्षण केवळ पदवी मिळवण्यासाठी नसून, आणीबाणीच्या प्रसंगी एखाद्याचे प्राण वाचवण्यासाठी असते, याचा प्रत्यय नुकताच गोवा ते मुंबई या विमान प्रवासादरम्यान आला. पालघर जिल्ह्यातील वेदांत मेडिकल कॉलेजचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी आणि वसईचा रहिवासी असलेल्या डॉ. आर्यन लोलयेकर याने दाखवलेल्या प्रसंगावधाणामुळे एका सहप्रवाशाला अक्षरशः जीवदान मिळाले.

ही घटना ३ फेब्रुवारी रोजी घडली. गोवा येथील दाबोलीम विमानतळावरून दुपारी ३.५० वाजता इंडिगो एअरलाइन्सचे विमान मुंबईसाठी झेपावले. विमान आकाशात झेपावल्यानंतर काही वेळातच एका सहप्रवाशाला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. बघता बघता त्या प्रवाशाची प्रकृती अधिकच खालावली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विमानातील क्रू मेंबर्सनी विमानात कोणी डॉक्टर आहे का? अशी विचारपूस सुरू केली. यावेळी एमबीबीएसच्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या डॉ. आर्यन लोलयेकर यांनी जराही वेळ न दवडता मदतीसाठी धाव घेतली. डॉ. आर्यन यांनी रुग्णाची तपासणी केली असता, त्यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण अत्यंत वेगाने कमी होत असल्याचे लक्षात आले. रुग्णाचे पल्स रेट कमी होत होते आणि ते ग्लानीत चालले होते. आकाशात हजारो फूट उंचीवर असताना, रुग्णाचा जीव धोक्यात होता. डॉ. आर्यन यांनी आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा वापर करत ताबडतोब प्रथमोपचार सुरू केले. विमानात उपलब्ध असलेल्या आपत्कालीन ऑक्सिजन सिलिंडरचा वापर करून रुग्णाला कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्यात आला.

डॉ. आर्यन यांच्या या तत्परतेमुळे काही वेळातच रुग्णाची प्रकृती स्थिर झाली. त्यानंतर सुमारे ४५ मिनिटांच्या प्रवासानंतर विमान मुंबई विमानतळावर सुरक्षित उतरले. तिथे इंडिगोच्या ग्राउंड स्टाफने रुग्णाला पुढील उपचारांसाठी तातडीने रुग्णालयात हलवले.

### इंडिगोकडून विशेष कौतुक

या कठीण प्रसंगी डॉ. आर्यन यांनी दाखवलेले धैर्य आणि प्रसंगावधान यामुळे इंडिगो एअरलाइन्स आणि विमानातील सर्व प्रवाशांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे आभार मानले. एका भावी डॉक्टरने आपले कर्तव्य चोख बजावून एका अनमोल जिवाचे रक्षण केल्याने सर्व स्तरांतून डॉ. आर्यन लोलयेकर यांचे कौतुक होत आहे.

### डॉक्टरांचे कर्तव्य बजावले!

प्रवाशाची अवस्था पाहून क्षणभर भीती वाटली, पण वैद्यकीय शिक्षणाने मला धैर्य दिले. रुग्णाला वेळेवर ऑक्सिजन मिळाला नसता तर परिस्थिती गंभीर झाली असती. एका जिवाचे प्राण वाचवू शकलो, याचे समाधान मोठे आहे, अशी भावना डॉ. आर्यन लोलयेकर यांनी व्यक्त केली.

Palghar Edition
Feb 08, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष : 29 अंक-230 मुंबई, रविवार 8 फरवरी 2026 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# हजारों फीट ऊपर इंसानियत की जीत, इंडिगो फ्लाइट में मेडिकल छात्र ने बचाई जान

## वसई के डॉ. आर्यन लोलयेकर की तत्परता से यात्री की हालत स्थिर



**वसई :** गोवा से मुंबई जा रही इंडिगो एयरलाइंस की एक उड़ान में उस वक्त हड़कंप मच गया, जब विमान के भीतर एक यात्री की अचानक तबीयत गंभीर रूप से बिगड़ गई। सांस लेने में दिक्कत और शुगर लेवल के तेजी से गिरने से यात्री की हालत नाजुक हो गई थी। ऐसे संकट के क्षणों में वसई निवासी और वेदांत मेडिकल कॉलेज के अंतिम वर्ष के छात्र डॉ. आर्यन लोलयेकर ने तत्परता दिखाते हुए समय पर इलाज कर यात्री की जान बचा ली।यह घटना 3 फरवरी की है।

दोपहर 3:50 बजे दाबोलिम एयरपोर्ट, गोवा से उड़ान भरने के कुछ ही समय बाद यात्री की तबीयत बिगड़ने लगी। हालात को देखते हुए क्रू मेंबर्स ने विमान में डॉक्टर की घोषणा की। तुरंत आगे आए डॉ. आर्यन ने प्राथमिक जांच में पाया कि यात्री का शुगर लेवल खतरनाक रूप से गिर रहा है और पल्स रेट भी कम हो रही है।हजारों फीट की ऊंचाई पर आपात स्थिति में उपलब्ध संसाधनों का उपयोग करते हुए डॉ. आर्यन ने ऑक्सीजन सिलिंडर से तत्काल उपचार शुरू किया। समय पर दी गई चिकित्सा सहायता से यात्री की हालत धीरे-धीरे स्थिर हो गई। करीब 45 मिनट बाद विमान सुरक्षित रूप से मुंबई एयरपोर्ट पर उतरा, जहां ग्राउंड स्टाफ ने यात्री को आगे के इलाज के लिए अस्पताल पहुंचाया। डॉ. आर्यन के साहस, सूझबूझ और पेशेवर दक्षता की इंडिगो एयरलाइंस के क्रू मेंबर्स और विमान में मौजूद यात्रियों ने तालियों के साथ सराहना की।

इस मौके पर डॉ. आर्यन ने कहा,'स्थिति गंभीर थी, लेकिन मेरी चिकित्सा शिक्षा ने मुझे हौसला दिया। समय पर ऑक्सीजन नहीं मिलती तो हालात बिगड़ सकते थे। एक जान बचा सका, यही मेरे लिए सबसे बड़ा संतोष है।' यह घटना न सिर्फ चिकित्सा सेवा के महत्व को दर्शाती है, बल्कि यह भी साबित करती है कि सही समय पर लिया गया निर्णय किसी की जिंदगी बचा सकता है।

# आसमान में 'देवदूत' बना मेडिकल छात्र
# उड़ान के दौरान बचाई यात्री की जान

**गोवा-मुंबई इंडिगो फ्लाइट में आपात स्थिति, वसई के डॉ. आर्यन लोलयेकर की सूझबूझ से टली अनहोनी**

■ वसई/संवाददाता

गोवा से मुंबई जा रही इंडिगो एयरलाइंस की एक फ्लाइट में उस समय अफरा-तफरी मच गई, जब एक यात्री की अचानक तबीयत बिगड़ गई। सांस लेने में दिक्कत और शुगर लेवल तेजी से गिरने के कारण यात्री की हालत गंभीर हो गई। इसी बीच वसई निवासी और वेदांत मेडिकल कॉलेज के अंतिम वर्ष के छात्र डॉ. आर्यन लोलयेकर ने त्वरित प्रतिक्रिया देते हुए यात्री की जान बचा ली। यह घटना ३ फरवरी की है। दाबोलिम एयरपोर्ट से दोपहर ३:५० बजे उड़ान भरने के कुछ समय बाद ही यात्री की तबीयत बिगड़ने लगी। स्थिति की गंभीरता को देखते हुए क्रू मेंबर्स ने विमान में डॉक्टर की घोषणा की।



डॉ. आर्यन तुरंत आगे आए और जांच में पाया कि यात्री का शुगर लेवल तेजी से गिर रहा है और पल्स रेट भी कम हो रही है। हजारों फीट की ऊंचाई पर आपात स्थिति में डॉ.आर्यन ने उपलब्ध ऑक्सीजन सिलिंडर से प्राथमिक उपचार शुरू किया। समय पर दिए गए उपचार से यात्री की हालत स्थिर हुई। करीब ४५ मिनट बाद विमान सुरक्षित रूप से मुंबई एयरपोर्ट पर उतरा, जहां ग्राउंड स्टाफ ने यात्री को आगे के इलाज के लिए अस्पताल पहुंचाया। डॉ. आर्यन के साहस और पेशेवर दक्षता की इंडिगो एयरलाइंस सहित विमान में मौजूद यात्रियों ने तालियों के साथ सराहना की। डॉ. आर्यन का ने कहा कि,

'स्थिति गंभीर थी, लेकिन चिकित्सा शिक्षा ने हौसला दिया। समय पर ऑक्सीजन नहीं मिलती तो हालात बिगड़ सकते थे। एक जान बचा सका, यही सबसे बड़ा संतोष है।'

मुंबई केसरी टाइम्स